# महाराष्ट्र वन सेवा,(मुख्य) परीक्षा-२०१६

## जाहिरात क्रमांक ३४/२०१६

## लेखी परीक्षेच्या निकालाची घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक १४ ऑगस्ट, २०१६ रोजी, घेण्यात आलेल्या महाराष्ट्र वन सेवा, (मुख्य) परीक्षा-२०१६ च्या लेखी परीक्षेचा निकाल दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ रोजी जाहीर करण्यात आला आहे. लेखी परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती मुंबई केंद्रावर घेण्यात येतील. मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर स्वतंत्ररित्या लवकरच प्रसिध्द करण्यात येईल.

२. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, लेखी परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीकरिता प्रवेश देण्यात आला आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

३ प्रस्तुत परीक्षेत अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची फेर पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविण्याच्या दिनांकापासून १० दिवसात आयोगाकडे ऑनलाईल पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक राहील. (आयोगाच्या संकेतस्थळावरील सर्वसाधारण सूचनेतील सूचना क्र.३.८ कृपया पहावी.)

सदर निकाल आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

दिनांक : ३ **नोव्हेंबर**, २०१६

ठिकाण- मुंबई

**दि. सो. उराडे**
अवर सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई